वर्ष - आठवे

ऑगस्ट / सप्टेंबर २०११

अंक - आठवा

# साखरसंघ वृत्त

फक्त खाजगी वितरणासाठी

महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., साखर भवन, नरीमन पॉईन्ट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०४२६७६ / २२०४२९०१ / ४०६८६९०० ● ई-मेल : I) mahasugar@airtelmail.in, II) mahasugarfed@gmail.com

संपादकीय

## "साखर निर्यात व आयात"

आपल्या देशातील व राज्यातील ऊस लागवड पिक क्षेत्र उत्पादन हे जसे नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असते. किंबहूना त्यापेक्षा अधिक साखरेचे दर व उसाला मिळणाऱ्या किंमती/मोबदला यावर अधिकतर अवलंबून असते. दर दोन तीन वर्षानी साखर उद्योग/व्यवसाय यामध्ये तेजी मंदीमुळे ऊस क्षेत्र घटत किंवा वाढत असते.

भारत सरकारनी वर्ष २०११ मध्ये एकूण १५ लाख टन साखर निर्यातीची टप्प्या टप्प्याने मंजूरी दिली. त्यामुळे देशांतर्गत बाजारातील साखरेचे भाव स्थिर व तसेच वाढण्यास मदत झाली. परंतू उद्योग जगतातील एक नामांकित कंपनी आय.टी.सी.लि. यांचे असे अनुमान आहे की, साखरेचा अधिक खप असलेला भारत देश हा ऑक्टोबर २०१२ नंतर कमी उत्पादन व अधिक खप असलेल्या देशामध्ये मोडेल व चीन प्रमाणे हा वेळोवेळी आयात करणारा देश ठरेल. स्टॅण्डर्ड चार्टड कंपनीचे म्हणणे असे आहे की, यामुळे जागतिक बाजार पेठेतील साखरेच्या भावामध्ये वाढ होईल.

आय.टी.सी. कंपनीच्या खरेदी विभागाचे प्रमुख यांनी असे सांगितले की, भारतातील साखरेची जास्त खरेदी करण्यामध्ये कोकाकोला आणि पेप्सी कंपनी यांच्या नंतर आय.टी.सी.चा तिसरा क्रमांक लागतो. देशांतर्गत मिळणाऱ्या कमी किंमतीमुळे साखर उत्पादनात घट होईल. तसेच मिठाई, बिस्कीट व चॉकलेट यांच्याकरीता वाढलेल्या मागणीमुळे साखरेच्या उत्पादनापेक्षा मागणी जास्त राहील. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये साखरेच्या दुसऱ्या क्रमांकावर असणारा चीन यांच्या बरोबर भारताचे संभाव्य खरेदीमुळे जागतिक बाजारपेठेतील मागणी वाढेल व त्याचा फायदा जागतिक बाजारपेठेतील पुरवठादार इंडोनेशियाला मिळेल. येत्या ऑक्टोबरपासून सुरु होणाऱ्या साखर वर्षामधील उत्पादनापेक्षा ४० लाख टनानी जागतिक बाजारपेठेतील मागणी जादा राहील यामुळे दर तेजीत राहतील कारण आयात करणाऱ्या देशांना त्यांचा राखीव साठा करणे जरुरी राहील असे आंतरराष्ट्रीय साखर संघटनेने नमूद केले आहे.

या विरुध्दची दुसरी बातमी लंडन येथील बर्कले कॅपिटल यांचे उपाध्यक्षांनी दिली आहे. सिंगापूर येथील डाऊ जोन्स कंपनीच्या म्हणण्यानुसार जागतिक साखर भविष्यकालीन निवादा (Future Trading) मध्ये सध्याच्या दरामध्ये ऑक्टोबर

# उसाच्या भरघोस उत्पादनासाठी वापरा ‘महाधन’ ची दर्जेदार उत्पादने

## महाधन बेनसल्फ

**भारतातील पहिले दाणेदार (पेस्टाईल) ९०% गंधक खत**

पिकांच्या गरजेनुसार उपलब्ध.

जमिनीतून कमीतकमी निचरा.

इतर खतांबरोबर मिसळून देण्यास उत्तम.

उसामध्ये रसाची प्रत सुधारून साखरेचे प्रमाण व उतारा वाढतो.

उसामधील बुरशीजन्य रोग प्रतिकारशक्ती वाढते.

अल्कधर्मीय, चुनखडीयुक्त व चोपण जमीन सुधारते. परिणामी उसामध्ये लोहाच्या कमतरतेमुळे पडणाऱ्या केवड्याचे नियंत्रण होऊन पीक हिरवेगार होते.

**पिकाचा दर्जा सुधारून उत्पादन वाढविते**

*एकरी प्रमाण : लागवडीच्या वेळी एकरी १५ किलो व मोठ्या बांधणीच्या वेळी एकरी २० किलो इतर खतांसोबत मिसळून द्यावे.*

**५, १० व २५ किलो पॅकिंगमध्ये उपलब्ध**

## महाधन क्रांती

**पिकांच्या संपूर्ण वाढीसाठी सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खत**

नत्र, स्फुरद व पालाश अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढविते.

पानांमधील हरितद्रव्य निर्मितीस सहाय्य.

उसाच्या कांडीची जाडी व लांबी वाढविते.

उसामधील साखरेचे प्रमाण वाढवून कांड्यामधील पोकळपणा दूर करते.

कांडीचा आतील भाग लाल होण्यापासून बचाव करते.

**पीक व मालाचा दर्जा सुधारून उत्पादन वाढविते**

*एकरी प्रमाण : लागवडीच्या वेळी एकरी १० किलो व मोठ्या बांधणीच्या वेळी एकरी १० किलो इतर खतांसोबत मिसळून द्यावे.*

**१० व २५ किलो पॅकिंगमध्ये उपलब्ध**

**दीपक फर्टिलायझर्स अॅण्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड**

गोल्फ कोर्स समोर, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे - ४११ ००६. फोन : (०२०) ६६४५ ८११२/१३

फॅक्स : (०२०) २६६८ ३७२७ इ-मेल : vbpatil@deepakfertilisers.com वेबसाईट : www.dfpcl.com

**‘महाधन’ - कृषि समृध्दीचे अभियान**

पासून सुमारे २२ टक्के घट होईल. कारण पृथ्वीच्या उत्तर गोलार्धातील उत्कृष्ठ ऊस/बीट यांच्या उत्पादनामुळे सुमारे ४५ लाख टन अधिक साखरेचे उत्पादन जागतिक बाजारात येईल. न्युयार्क बाजारातील सरासरी साखरेची किंमत प्रती पाऊंड २४ सेंट अशा २०१२ च्या प्रथम तिमाहीमध्ये राहतील त्या अनुमानानुसार जागातिक साखर उत्पादन हंगाम २०११-१२ मध्ये ५.२ टक्क्यांनी जास्त असल्याचे अनुमान आहे. हे वाढीव उत्पादन युरोपियन युनियन, भारत, रशिया व थायलंड कडून होईल. भारताचे साखर उत्पादन पुढील वर्षी (२०११-१२) सुमारे १० टक्क्यांनी वाढून ते २६५ लाख टनापर्यन्त जाईल असे नमूद केले आहे.

एकूण भविष्यकालीन बाजारपेठेच्या अभ्यासा-वरुन नेहमी करीता सातत्याने व नियोजनपूर्वक ऊस उत्पादक शेतकरी फायद्यात राहील असे वाटते. राज्यातील ३१ सहकारी साखर कारखाने ४२१ मे.वॅट सहवीज निर्मिती करीत आहेत. त्यामध्ये ५ टक्के भागभांडवल (रु.९६ कोटी) हे राज्य शासनाचे आहे. ५७ सहकारी साखर कारखान्यांना राज्य शासनाची मंजूरी असून त्यांची एकूण वीज निर्मिती क्षमता १०५३ मेगावॅट पर्यन्त आहे. आसवणी, इथेनॉल व इतर रसायनांमुळे सहकारी साखर कारखान्यांचा आर्थिक स्त्रोत वाढला आहे. ती महाराष्ट्राची एक जमेची बाजू आहे.

## खुला परवाना अंतर्गत (ओ.जी.एल.) ५ लाख टन साखर निर्यात

आम्हाला कळविण्यास आनंद वाटतो की, मा.नामदार श्री. शरदचंद्रजी पवारसाहेब, कृषि व अन्न प्रक्रिया मंत्री, भारत सरकार व मा.नामदार श्री.पृथ्वीराजजी चव्हाणसाहेब, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या सातत्याच्या प्रयत्नामुळे केंद्र शासनाने १९ ऑगस्ट, २०११ रोजी आणखी ५ लाख टन साखर ओ.जी.एल. अंतर्गत निर्यातीसाठी खुली केली आहे. दि.२४ ऑगस्ट,२०११ रोजी आंतरराष्ट्रीय बाजार पेठेतील बाजार भाव ८००.५० अमेरिकन डॉलर्स असे होते. त्यानुसार जहाजावरील माल पोहोच करण्याची किंमत रु.३६,५६६/- प्रति मे.टन होते. ही किमंत लक्षांत घेता साखर निर्यातीसाठी कारखान्याला जागेवर १०० किंवा १०० पेक्षा कमी इकूम्साच्या साखरेला रु.३३,५००/- प्रति मे.टन असा भाव मिळत आहे. ज्या कारखान्यांच्या साखरेचा इकूम्सा १०० युनिट पेक्षा जास्त आहे अशा कारखान्यांना रु.३२,५००/- ते रु.३३,०००/-प्रति मे.टन असा भाव मिळू शकतो. पर्याय 'बी'साठी रु.८,५००/-प्रति मे.टन या दराने उत्तर प्रदेशामधील एका कारखान्यांने सौदा केला आहे.

स्थानिक बाजारपेठेतील साखर भावापेक्षा आंतरराष्ट्रीय बाजार पेठेतील साखरेचे भाव उत्पादन खर्चा पेक्षा प्रति मे.टनास रु.६,०००/- ने जास्त असल्याने साखर कारखान्यांना पर्याय 'बी' चा वापर करण्यापेक्षा साखर निर्यात करणे केव्हाही जास्त

फायदेशीर आहे. साखर निर्यात करण्याने कारखान्यांचा साखर साठा कमी होण्यास तसेच ऊसाच्या देय रकमेपैकी शिल्लक ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यास मदत होणार आहे. तसेच काही प्रमाणात संचित तोटे कमी होण्यासही मदत होणार आहे. पुढील २०११-१२ हंगामातील अतिरिक्त साखर उत्पादन लक्षांत घेता साखरेचे साठे तातडीने कमी होणे आवश्यक आहे. तरच पुढील हंगामाची साखर साठविण्यासाठी गोदामे उपलब्ध होतील अन्यथा तात्पुरती ताडपत्रीची गोदामे उभारावी लागतील त्यामुळे खर्च वाढेल तसेच मुसळधार पावसामुळे व सोसाटयाच्या वाऱ्यामुळे साखर खराब झाल्यास प्रचंड मोठे आर्थिक नुकसान संभवते. हे सर्व टाळण्यासाठी राज्यातील सर्व साखर कारखान्यांनी प्रत्यक्ष साखर निर्यात करण्याची संधी त्वरीत साधावी.

**श्रीकांत सूर्यवंशी**
वाणिज्य अधिकारी

# साखर विनियंत्रण - योग्य वेळ

## १० टक्के नियंत्रित साखर व मासिक साठा वितरण पध्दती समाप्त करा - भारतीय उद्योग संगठण - मागणी

सरकारने साखर उद्योग नियंत्रणमुक्त करणेस्तव हिच योग्य वेळ आहे असे भारतीय उद्योग संघटनेने (CCI Confenderation of Industry) नवी दिल्ली येथे नमूद केले आहे. येत्या नवीन साखर हंगाम २०११-१२ च्या सुरवातीचा साठा ५० लाख असेल. अंदाजित उत्पादन २६० लाख टन व वार्षिक खप २२० लाख टन धरुन ९० लाख टन अतिरिक्त साठा असेल. या आकडेवारीचा विचार करुन विनियंत्रणास यापेक्षा अधिक चांगली वेळ राहणार नाही. असे श्रीराम कनसॉलीडेड लिमिटेडचे वरीष्ठ व्यवस्थापकीय संचालक व राष्ट्रीय उद्योग संघटनेच्या साखरेवरील राष्ट्रीय समितीचे अध्यक्ष श्री.अजय श्रीराम यांनी नमूद केले.

साखर हंगाम २०१०-११ मध्ये ५ कोटी ऊस उत्पादक शेतकरी व त्यांच्या कुटुंबियांना ५५,००० कोटी रुपयांची ऊस देयके साखर उद्योगाने देशात वितरीत केली आहेत. सिंमेट, दुरसंचार, हवाई वाहतूक, पोलाद व नुकतेच खत उद्योगाला सरकारने नियंत्रणमुक्त केले आहे. त्या प्रमाणेच साखर उद्योग नियंत्रण मुक्त करणेस्तव पावले उचलावीत.

साखर नियंत्रणमुक्त केल्याने ग्राहकांवर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता नाही. कारण राष्ट्रीय नमुना पाहणी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की, शहरी भागामध्ये ग्राहकांच्या खर्चामध्ये साखरेचा हिस्सा १.५ टक्के

तर ग्रामीण भागामध्ये २.४ टक्के आहे. दुध, भाजीपाला, कडधान्ये, खाद्य तेल अथवा पेये या सर्व खाद्यपदार्थांमध्ये साखरेचा खर्च वरील पदार्थांच्या सरासरी खर्चामध्ये कमी आहे.

"केपीएमजी" (KPMG) या कंपनीच्या पाहणी अहवालानुसार ६७ टक्के साखरेचा वापर हा मिठाई, बिस्कीटे, शितपेये व औषध कंपन्यांकरीत असतात. तर ३३ टक्के वापर हा घरगुती कारणास्तव होत असतो. त्यातील १० टक्के हे सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत शिधापत्रिकेवर सवलतीच्या दराने मिळतो. सर्वसाधारणपणे प्रति कुटुंबियांचा मासिक खप ४ ते ५ किलो आहे. त्यामुळे प्रति किलो रु.५/- वाढ ही सहजपणे मान्य होऊ शकते, असे मे.राजश्री शुगर्स आणि केमिकल्सच्या व्यवस्थापकीय संचालिका व राष्ट्रीय उद्योग संघटनेच्या उपाध्यक्षा श्रीमती राजश्री पथी यांनी नमूद केले. या संगठनेने त्वरीत १० टक्के नियंत्रित साखर व मासिक वितरण साठा समाप्त करण्याचे सरकारला आवाहन केले आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी खुल्या बाजारातून खरेदी व किमंतीवर नियंत्रण ठेवण्यास्तव सरकारने राखीव साठा ठेवावा असे प्रतिपादन केले आहे. यामुळे साखर उद्योगाला खुल्या साखरेचा साठा सांभळावा लागणार नाही किंवा त्यावरील व्याजाचा भुर्दंड पडणार नाही. एक भक्कम व पारदर्शक भविष्यकालीन विक्री व्यवस्थेमुळे (Forward Marketing) देखील किंमती स्थिरावतील.

व्यापारी साठा व उद्योगांवरील साखर साठा बंधन ज्यूट पॅकिंग ऐवजी इतर वस्तूंचा वापर, सातत्यपूर्ण निर्यातीचे धोरण, साखर व उप - पदार्थांच्या विक्री मुल्याशी ऊसाच्या किंमतीची सांगड (मळी, चिपाड इ.) आणि पेट्रोलमध्ये मिसळण्याकरीता इथेनॉलचा वापर व त्याला योग्य किंमत अशा आवश्यक बाबींचा विचार करावा लागणार आहे.

महाराष्ट्रातील खाजगी साखर उद्योगाची वाटचाल पाहता, सहकारी व खाजगी उद्योगाने एकमेकांशी योग्य समन्वय व परस्पर पुरक धोरणे अवलंबिणे हिताचे राहिल असे वाटते.

## सुविचार

**मोठी माणसं वैचारिक चर्चा करतात, सामान्य माणसं प्रासंगिक चर्चा करतात, संकूचित विचाराची माणसं वैयक्तिक चर्चा करतात !**

**- एलेनार रुझवेल्ट**

**राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात महिला सक्रिय झाल्या, तर युद्ध कायमची थांबतील.**

**- ऑगस्टा स्टोव-गुलेन**

**यशाचा आनंद घ्यायचा असेल तर आयुष्यात कठीण प्रसंगांनाही तोंड द्यायला हवं.**

**- डॉ. अब्दुल कलाम**

# श्रीगणेश चतुर्थी,
# दसरा व दिपा